29 AUG 2017

क्रमांक : पोआअ/प्रबंधक शाखा/बॅनर छपाई-दरपत्रके/ 10784 /२०१७ अमरावती शहर दिनांक २८/८/२०१७

**विषय :-** जनतेमध्ये जागरूकता निर्माण होणेकरीता शहरातील गणेश मंडळ/दुर्गादेवी मंडळे तसेच गर्दिचे ठिकाणे, रेल्वे स्टेशन,बस स्टॅन्ड, बाजारपेठा इत्यादी ठिकाणी जनहितार्थ ८x६ साईजचे लोखंडी बॅनर छपाई करावयाचे असल्याने त्याबाबतचे दरपत्रक सादर करणे

---oo---

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरून कळविणेत येते की, जनतेमध्ये जागरूकता निर्माण होणे करीता दहशतवाद विरोधी कक्षातर्फे अमरावती शहरातील काही मोठया गणेश मंडळ/दुर्गादेवी मंडळे व रेल्वे स्टेशन, बसस्थानक, गर्दीचे ठिकाणे, बाजारपेठा व इतर ठिकाणी वाहतुकीस अडथळा होणार नाही अशा ठिकाणी जनहितार्थ ३० नग ८x६ साईजचे फलक (बॅनर) छपाई करून तसेच लावण्याकरीता दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदरचे पत्र या कार्यालयाचे बेबसाईडवर सुध्दा अपलोड करण्यात येत आहे. तरी अधिकृत पुरवठादार / वितरक/मेसर्स/दुकानदार यांनी बॅनर छपाई बाबतचे दरपत्रके दोन लिफाफा पध्दातीनुसार या कार्यालयातील प्रबंधक शाखेत पत्र निर्गमीत दिनांकापासून ०७ दिवसाचे आंत (शासकीय सुटटी वगळून) सादर करावयाची आहेत. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकाचाच विचार करण्यात येईल याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी.

पहिला लिफाफा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्र -१) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्र -२) असे दोन लिफाफा या कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहेत. दुसरा लिफाफा (विवरणपत्र -२) मध्ये दरपत्रके तसेच **तांत्रिक लिफाफयामध्ये खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे**. तांत्रिक लिफाफा (विवरणपत्र -१) मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे सादर न केल्यास सदर प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१) पुरवठादाराचे फर्म नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत
२) पॅन कार्ड ची झेरॉक्स प्रत
३) जी.एस.टी. प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत

**तांत्रिक लिफाफामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबत दिनांक व वेळ संबधीतांना दरपत्रके उघडण्यापुर्वि सुचीत करण्यात येईल.**

(पोलीस आयुक्त,यांचे मान्यतेने)

पोलीस आयुक्त,अमरावती
यांचे करीता.

**प्रति,**

१) ------------------------------------------------------------
२) ------------------------------------------------------------
३) ------------------------------------------------------------

**प्रत,**

सपोनि सायबर सेल, अमरावती शहर.

२/- सदरचे पत्र या कार्यालयाचे अधिकृत बेबसाईडवर न चुकता आजच अपलोड करावे हि विनंती. जेणे करून ईच्छूक वितरक/दुकानदार/मेसर्स/पुरवठादार हे वेळेच्या आंत दरपत्रके कार्यालयास सादर करतील.